I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 212-215
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ग्रामीण विकासात ग्रामीण साहित्याची भूमिका : एक आकलन

प्रा. डॉ. जयश्री शास्त्री

सहयोगी प्राध्यापक
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

Communicated : 02.04.2022 | Revision : 07.04.2022 Accepted : 12.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

ग्रामीणता हे भारतीय प्रदेशाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. इ.स. १८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त झाली. ते अनेक दिशांनी समृद्ध आणि वैविध्यपूर्ण झाले तरी सामाजिकदृष्ट्या ते जाणीवांच्या दृष्टीने मर्यादित जीवन कक्षेतच प्रगट होते. मात्र याच दरम्यान म. फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल शिंदे हे तत्कालीन भेसूर सामाजिक वास्तवाकडे आपले लक्ष केंद्रित करून ग्रामीण या अंतर्गत येणारे शेतकरी, मजूर, कामगार, कोळी आदिवासी, पददलीत हे साहित्याचे विषय होऊ लागले. कोणत्याही साहित्याच्या प्रेरणा शोधताना त्या साहित्य निर्मितीचा जो कालखंड असतो तो विचारात घ्यावा लागतो.

त्यामुळे साहित्य हा समाजाचा आरसा या बीद्रानुसार ग्रामीण साहित्यातून तत्कालिन परीस्थितीचे पडसाद उमटले. साठोत्तरी कालखंडात आनंद यादव, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, चन्द्रकुमार नलगे, शंकर पाटिल, महादेव मोरे, सरोजिनी बाबर, सदाशिव माळी, विश्वास पाटील, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, भास्कर चंदशिव, राजन गवस, रविंद्र शोभणे इ. कितीतरी साहित्यिकांनी आजतागायत बदलत्या ग्रामरचनेचे स्वरूप आणि प्रश्न आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहेत. त्यांच्या कलाकृतीच्या आधारावरच प्रस्तुत शोध निबंधातून ग्रामीण परिसराचे परिवर्तन होताना त्याचे पडसाद साहित्यातून कसे उमटत गेले आणि प्रतिभावंत लेखकांच्या साहित्य निर्माणामुळे ग्रामीण विकासात ग्रामीण साहित्यिकांची भूमिका कशी मौलिक ठरली याचे आकलन करून अभ्यास मांडण्याचा प्रयत्न करण्यातत आला आहे.

भारतीय प्रदेशाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीणता उष्ण कटिबंधाच्या या भारतात पठार, डोंगराळ आणि किनारपट्ट्यांचा भाग तीन भूरचना प्रामुख्याने दिसत असल्याने शेती हा भारतातील मुख्य व्यवसाय मानला गेला. शेती आणि व्यवसायाच्या विभागणीनुसार भारतीय समाजव्यवस्था ग्रामीण समाज आणि नागरी समाजात विभागलेली दिसून येते. यातील ग्रामीण समाज हा आकाराने लहान, भाषा, संस्कृती, परंपरा या दृष्टीने एकजिनसी आणि शेती व त्या संबंधीच्या जोडधंद्याशी निगडित असतो. ग्रामीण समाज हा खेड्यातून वसला आहे. भारत हा मुख्यत: खेड्यांनी बनलेला देश आहे. या ग्रामीण जीवनाचे चित्रणच ग्रामीण साहित्यातून प्रगटले आहे.

**साहित्यातील ग्रामीणतेचे स्वरूप :**

खेड्यातील म्हणजे गावातील जीवनाची अनुभूती ग्रामीण साहित्यातून व्यक्त होते. खेडेगांव तेथील जीवनपध्दती, खास तिथल्या अशा रीतीने शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक सामाजिक धार्मिक ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये त्या साहित्यात येताते, असे वर्णन श्री. आनंद यादव यांनी केले आहे.१ ग्रामीण साहित्य हे ग्रामजीवनसंबध्द असते. प्रादेशिक आणि ग्रामीण यांचे प्रवाह देखील बरेचदा परस्परांत मिसळलेले आढळतात. या दोघांतील फरक दाखवितांना ग्रामीण साहित्य व्यक्तिनिष्ठ असते आणि प्रादेशिक साहित्य समूह निष्ठ असते असा खुलासा आनंद यादव यांनी केला आहे. ''ग्रामीण साहित्य हे हिंदू धर्मासारखे आहे. हिंदू धर्म जसा एक धर्मसंस्थापक, धर्मग्रंथ, तत्त्वज्ञान आचारपध्दती नाही; परस्पर विरोधी विचार पध्दती व जीवनशैली येथे एकत्र नांदताना दिसतात. काळाच्या ओघात अनेक गोष्टींचा समावेश करीत हा धर्म विकसित होत आला आहे. त्यात चांगल्या वाईटांचे मिश्रण झालेले आढळते तसे ग्रामीण जीवण एकसंध नाही. त्यात धर्म प्रदेश भाषा वर्ण जाती वर्ग व्यवसाय संस्कृती जीवनपध्दती यात खूपच वैविध्य आहे.''२ असे ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाविषयी मत डॉ. कृष्णा इंगोले आणि प्रा. भास्कर चंदनशिव यांनी व्यक्त केले आहे.

**साठोत्तरी साहित्य प्रवाहातील ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा :**

इसवी सन १८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त झाली असे मानले जाते. हे साहित्य अनेक दिशांनी समृध्द आणि वैविध्यपूर्ण झाले तरी सामाजिकदृष्ट्या मर्यादित जीवन कक्षेतच जाणिवांच्या दृष्टीने घोटाळत होते. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या मराठी समाजाचे सर्वांगीण दर्शन त्यातून घडत नव्हते. इ.स. १८७५ ते १९०५ या

कालखंडात संबंध महाराष्ट्रात सतरा ते अठरा प्रखर दुष्काळ पडून गेले त्यात खेडी उद्ध्वस्त झालीत. ग्रामीण समाजाची वाताहत झाली. या काळात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे आपले लक्ष केंद्रित केले. ही ऐतिहासिक पार्श्वभूमी बघता १९२० नंतर गांधीवादी विचारसरणीमुळे मराठीत सुशिक्षित वर्गाची आणि पर्यायाने मराठी साहित्यिकांची सामाजिक जाणीव व्यापक झाली. त्यातून ग्रामीण पर्यावरणातील मजूर, कामगार, कोळी, आदिवासी, कातकरी, पददलित हे सर्व साहित्याचे विषय होऊ लागले. अशाप्रकारे १९२५ पासून मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली.

**ग्रामीण साहित्यनिर्मितीची ऊर्जास्थाने :**

वास्तविक ''१९६० नंतर उदयाला आलेल्या सर्वच साहित्य चळवळींच्या मुळाशी मार्क्सवादी साहित्य चळवळ आहे''३ असे डॉक्टर नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटले आहे. अन्वेषण दृष्टीचा उदय अशा ऊर्जाकेंद्रातूनच होत असतो. महात्मा ज्योतीबा फुले हे या चळवळीचे पहिले आणि मुख्य ऊर्जा केंद्र होय. त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसुड', 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. ग्रंथांमधून जी चिकित्स केली आहे, ती एकूणच जीवन व्यवस्थेच्या संदर्भात त्याकाही एक युवा दृष्टिकोन देणारी आहे. १९२० ते २२ च्या दरम्यान महर्षी विठ्ठलरामजी शिंदे यांनी शेतीमालाच्या भावाचा प्रश्न उपस्थित केला तसेच भूमीचे फेरवाटप झाले पाहिजे असा क्रांतिकारी सिध्दांतही त्यांनी मांडला. विशेष म्हणजे त्या काळात महर्षी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या चळवळी का उभ्या राहू शकल्या नाहीत याची विचार मीमांसा केली आहे. यापुढेक ग्रामीणांचा, ग्रामीणांच्या शोषणाचा मूलगामी विचार करणाऱ्या विचारवंतांची मराठीत एक दीर्घ परंपरा आहे असे अभ्यासक वर्णितात. जसे महात्मा फुले, महर्षी शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, यशवंतराव चव्हाण, शरद जोशी इत्यादी एवढेच तर शेतकऱ्यांचे मोर्चे संघटित करणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचेही नांव याबाबत लक्षणीय ठरते असे डॉ. कोत्तापल्ले मानतात. एकूणच अशा विविध स्वरूपाच्या ऊर्जा केंद्रांच्या अन्वयार्थातून प्रेरणा घेऊनच ग्रामीण चळवळ उभी झाली आणि त्याचे पडसाद साहित्यनिर्मितीवरही उमटले.

**ग्रामीण साहित्याला पोषक स्थित्यंतरे :**

साठोत्तरीसाहित्यावर त्या कालखंडातील स्वरूप व वैशिष्ट्ये विविध सामाजिक स्थित्यंतरे व त्यामागील प्रेरणा या स्थित्यंतरांचा ग्रामीण समाजावर झालेला परिणाम या सर्व बाबींचे पडसाद उमटले आहेत. या काळात मराठी साहित्याला दलित साहित्य प्रवाह व ग्रामीण साहित्य प्रवाह अशा दोन स्वतंत्र प्रवाहांची नोंद घ्यावी लागली. त्यापैकी राजकीय स्थित्यंतर, औद्योगिक स्थित्यंतर, शैक्षिक स्थित्यंतर, धार्मिक स्थित्यंतर, शेतीविषयक स्थित्यंतर, सांस्कृतिक स्थित्यंतर, सामाजिक स्थित्यंतर अशा विविध स्वरूपाच्या स्थित्यंतरामुळे बदललेल्या खेड्याचे स्वरूप दिसू लागले. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासकीय पातळीवरून अनेक उपक्रम राबविले गेले. त्यावेळी भारत सरकारने पंचवार्षिक योजनांत ग्रामीण विकासाला अग्रक्रम दिला. त्यासाठी जमीन सुधारणा, समाज विकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, किसान गरजा कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, ग्रामीण युवकांसाठी स्वयं रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी उपक्रम कार्यवाहीत आणले या कार्यक्रमांमुळे आणि वेगवेगळ्या पातळ्यांवरील स्थित्यंतरामुळे खेडी बदलली. आधुनिक काळात खेड्यातील औद्योगिकीकरण, नव्या व्यवसायांचा झालेला विकास, शिक्षणामुळे बलुतेदार जातीच्या लोकांत निर्माण झालेली अस्मिता, स्वत: हक्कांची जाणीव या कारणांमुळे बदललेली खेडी आणि त्यांचे चित्रण ग्रामीण साहित्यातून लीलया अवतरू लागले.

**ग्रामीण साहित्यिकांची आविष्कृती :**

श्री. म. माटे, ग.ल. ठोकळ, दिघे, गो.नि. दांडेकर, श्री. ना. पेंडसे या सारख्या साहित्यिकांनी ग्रामीण जीवन प्रेरणांवर अधिक भर देऊन लेखन केले. ग्रामीण जीवनाविषयीची वाचकांची उत्सुकता त्यांनी वाढविली. ग्रामीण वाड्मयाच्या अस्तित्वाला विस्तार प्राप्त करून दिला. आनंद यादवांच्या मते ''ठोकळ–दिघे यांच्या ग्रामीण साहित्याचे कार्य ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे.... १९४५–५० च्या आसपास श्री. ना. पेंडसे, गो.नि. दांडेकर यांनी ग्रामीण जीवनावरील कथा–कादंबऱ्या लक्ष वेधतील अशा पध्दतीने लिहिल्या.''४ १९५०–५५ च्या जवळपास ग्रामीण साहित्यात नवे पर्व सुरू झाले. व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील या कथाकारांची कथा वेगळ्या दमाची ताकदीची माणसे आणि त्यांच्या भोवतालची परिस्थिती यांच्या संबंध संघर्षावर स्थिर होणारी मनाच्या सूक्ष्मतेचा वेध घेणारी होती. याच काळात म. भा. भोसले, ग.दि माडगूळकर, सरोजिनी बाबर, रणजित देसाई, उध्दव शेळके, द.मा. मिरासदार हे लेखक लेखन करीतच होते. मात्र १९६० च्या आसपास ग्रामीण साहित्य लिहिणारा बहुसंख्य लेखक वर्ग उदयास आला. जसे अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील, नामदेव व्हटकर, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक, द.का. हसमनीस, रा.र.

बोराडे, चंद्रकांत भालेराव, बा.भ. पाटील, आनंद यादव, चंद्रकुमरी नलगे, महादेव मोरे, सखा कलाल, चारूता सागर इ. ओ कोकण, सांगली—सातारा—कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ या प्रांतातून अनेक ग्रामीण लेखक निर्माण झाले. बऱ्याच ग्रंथांना उत्कृष्ट साहित्यनिर्मितीसाठीचे राज्य शासनाचे आणि सेवाभावी साहित्य—सांस्कृतिक संस्थांचे पुरस्कार मिळाले. 'झोंबी' आणि 'झाडाझडती', 'ताम्रपट', 'बारोमास', 'तणकट' या कादंबऱ्यांना चार राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाले. १९८० नंतरच्या ग्रामीण साहित्यावर जागतिकीकरणाचा काय परिणाम झाला. जागतिकीकरणाने ग्रामीण जीवन झापाट्याने बदलले. मराठी ग्रामीण कवितेत शेतकरी जीवनाचे चित्रण समाधानकारक आले आहे. जागतिकीकरणानंतरच्या शेतकरी जीवनातील दैन्य, उपासमार, ओढाताण अनेक कवींनी आपल्या कवितेत शब्दबध्द केली आहे. ना.धों. महानोर, विठ्ठल वाघ, प्रकाश होळकर शिवाजी मरगीळ, शंकर वाडेवाले, नारायण सुमंत, सुरेश शिंदे, जयराम खेडेकर, रमेश चिल्ले यांची कविता लक्षणीय आहे. जगदीश कदम, श्रीकांत देशमुख, महेश मोरे, किसन घाटुळे हे कवी शेतकरी जीवनावर सातत्याने कविता लेखन करीत आहेत. सदानंद देशमुख यांनी 'तहान' व 'बारोमास' यासारख्या कादंबऱ्यंतून समकालीन शेतकरी जीवनावर भाष्य केले आहे. जागतिकीकरणानंतर खेड्यातील शेतकरी कुटुंबाची झालेली पडझड त्यांच्या 'बारोमास' या कादंबरीत आली आहे. विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी त्यांच्या कथांतून केले आहे. 'बुढाई', 'पार्टटाईम' या कादंबऱ्यांतून इंगोले यांनी शहरीकरणाचे आक्रमण, आकर्षण, जागतिकीकरणामुळे वाढलेला पैशाचा प्रभाव या सर्वांमुळे धोक्यात आलेले ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. मधु सावंत यांच्या 'तिची वाटच वेगळी' या कथासंग्रहातून ग्रामस्तरावरील राजकारणाचा वेध घेतला आहे. त्यांच्याच 'राहू—केतू' आणि 'जिंदगानी' या कादंबऱ्यातून बदलत्या स्त्रीचे तसेच धरणामुळे होरपळलेल्या स्त्रियांचे प्रश्न 'पानवळी' या कथासंग्रहातून मांडले गेलेत.

फार पूर्वीपासून ते आजतागायत श्री. म. माटे, र.वा. दिघे, ग.दि. माडगूळकर, गो.नि. दांडेकर, श्री. गोरे, मनोहर तल्हार, केशव बोबडे, रा.रं. बोराडे, आनंद पाटील, दत्ता भोसले, डॉ. मधुकर वाकोडे, बाबाराव मुसळे, वासुदेव मुलाटे, बाबा भांड, श्रीराम गुंदेकर, अनिल पाटील, विश्वास पाटील अशा कितीतरी लेखकांच्या साहित्यातून बदलत्या ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण येते.

ग्रामीण साहित्याचे निकष लावताना प्रा. गो.मा. कुलकर्णी म्हणतात, ''सर्व साहित्य एकच असते; पण ग्रामीण अनुभवांचे स्वरूप शहरीपेक्षा निराळे असल्याने व्यवहारासाठी ग्रामीण असे विशेषण लावण्यास हरकत नाही. कोणताही अनुभव स्थलकाल अशी बध्द असतो म्हणून ग्रामीण साहित्याला निराळे स्थान आहे.''५ तर प्रा. मदन हातकणंगलेकर म्हणतात, साहित्याची कल्पना कालसापेक्ष आहे. पूर्वी साहित्यात खेळाचे वर्णन होते पण ते ग्रामीण साहित्य नव्हे पण ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांनी त्याचे जाणीवपूर्वक केलेले चित्रण हेच खरे ग्रामीण साहित्य होईल. ग्रामीण साहित्य अपरिहार्यपर्ण वास्तव हवे.

**ग्रामीण साहित्यात ग्रामीण साहित्याचे योगदान :**

१९७७ आणि १९७८ मध्ये आनंद यादवांनी तरुण ग्रामीण लेखकांचा मेळावा पुण्याच्या भारती विद्यापीठातील एरंडवणे येथे आयोजित केला. त्यात विचारवंतांची चर्चा आयोजिली. ज्यात प्रा. ग.बा. सरदार यांनी ''उद्योगप्रधान पाश्चात्य जीवनाच्या प्रभावाने आपल्याकडे सर्वच बदलले आहे. उद्योगप्रधान संस्कृतीने समाजाच्या सर्व थरांत ऐहिक जीवनाबद्दल जागृती आली. खेड्यातील जीवनावर जीवनावर छाप पडली.'' असे मत व्यक्त केले आहे.

मुळात ग्रामीण साहित्याचे ऐतिहासिक मूल्य फार मोठे आहे. आधुनिकतेच्या काळात खेडी बदलत आहेत. विविध पातळ्यांवर संक्रमण होत आहे. नवीन पध्दतीचा वापर करून शेती करीत आहे. विविध पातळ्यांवर संक्रमण होत आहे. नवीन पध्दतीचा वापर करून शेती करीत आहे. साखर कारखाने खेड्यांपर्यंत पोहोचले आहे. आणि त्या पाठोपाठ वीज, दळणवळण, पाणी इत्यादी सुविधा खेड्यात आल्या आहेत. एकूणच खेड्यातील संस्कृती, परंपरा आता पूर्वीच्या राहिल्या नाहीत. अशा प्रकारच्या ग्रामीण समीक्षकांच्या चिंतनातून एक बाब तर खरोखर घडून येतांना दिसते की, शिक्षणामुळे जी दृष्टी आली. त्यामुळे ग्रामीण लेखकांनी जे साहित्यातून व्यक्त केले त्या सुधारणा, शिक्षण, तंत्र – विकास, कारखाने, संस्था, सामाजिक उपक्रम, त्यांची चित्रण हळूहळू ग्रामीण साहित्यातून होऊ लागले. नव्वदोत्तरग्रामीण कादंबऱ्यांमध्ये जागतिकीकरणानंतर शेतीच्या समस्या कमी न होता बीजोत्पादन, कृषिमाल प्रक्रिया, कीटकनाशके इ. विषयीची चित्रणे तीव्रपणे व्यक्त होताना दिसतात. अनेक अडचणींना सामोरे जाऊन शेतकरी यशस्वीपणे चांगले कृषी उत्पादन घेतो. त्यावेळी त्याच्या वाट्याला कमी बाजार भावामुळे कसा व्यवस्था संघर्ष येतो याचे चित्रण 'पाचरूट' या अनिल जाखडे, 'पाडा' या अशोक कोळी, 'साखरफेरा' या मोहन पाटील तर 'कापूसकाळ' या कैलास दौंड लिखित कादंबऱ्यांमधून व्यक्त झाले आहे.

**समारोप :**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो; असे असले तरी त्याचे अपेक्षित विकासाचे प्रतिबिंब हवे असल्यास लेखक वास्तवासोबतच उपाययोजनांचे विचारही व्यक्त करीत असतो. जसे शेतकरी संघटना अथवा ग्रामीण साहित्य संमेलने ही साहित्यालाच नव्हे तर ग्रामीण विकासाला ही उपकारक ठरली आहे. शेतकऱ्यांभोवतीच्या समस्या या सारख्याच असतात आणि त्या सोडविण्यासाठी त्यांनी संघटनात्मक पातळीवर आवाज उठवून तीव्र आंदोलने केल्याशिवाय तरणोपाय नाही. याचे मार्मिक चित्रण सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' च्या शेवटी भिमराव वाघचौरे यांच्या 'गराडा' मधून अशोक कोळी यांच्या 'पाडा' शंकर सखाराम यांच्या 'एसईझेड', दिवाकर चौधरींच्या 'बू इर्वागमन' तसेच सुरेंद्र पाटील यांच्या 'चिखलवाटा' इत्यादी कादंबऱ्यांतून प्रभावीपणे साकारल्याचे दिसून येते. परंतु ग्रामीण साहित्याची भूमिका ग्रामीण विकासात फार मोठ्या प्रमाणात राहील असे शक्य नाही. जसे 'झाडाझडती' मधील पाणी विषयक समस्या आणि उपयोजनाचे चित्र हे ठराविक कलाकृतीतून मर्यादित स्वरूपात प्रकट करेल. मात्र त्यातूनच केवळ ग्रामीण विकास होणार नाही. ग्रामीण समस्यांवर ज्या उपाययोजना होतात त्याचे चित्रण बहुतांश साहित्यातून व्यक्त होते. प्रथम ग्रामीण विकासाचे साहित्यातून चित्रण आणि नंतर ग्रामविकास ही एक आरोही आदर्श कल्पना ठरेल. तरीही ग्रामीण साहित्य प्रवाहाचे ग्रामविकास चित्रणाचे योगदान निष्फळ ठरत नाही. ते वाढत्या विकासाचे वेध घेत जाणारच आहेत.

**संदर्भ :**

यादव आनंद, मराठी ग्रामीण कथेचा कथेचे स्वरूप—विचार, ग्रामीण सहित्य : स्वरूप आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस प्र.आ. १९७९, पृष्ठ क्र. ६३.

इंगोले डॉ. कृष्णा, संपादक ग्रामीण साहित्य आणि वास्तव, चळवळीचे साहित्यशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०११, पृष्ठ क्र. ०९

इंगोले डॉ. कृष्णा, संपादक ग्रामीण साहित्य आणि वास्तव, चळवळींचे साहित्यशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०११, पृष्ठ क्र. १८

यादव, आनंद, मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा, पृष्ठ क्र. ६३

मुळीक, डॉ. किर्ती, ग्रामीण साहित्याची चळवळ, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०११

उ.नि. पृष्ठ क्र. १३१

उ.नि. पृष्ठ क्र. १३५